राज्यातील १०० टक्के मुलांना व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेश देण्यासाठी महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे येथे व्यवसाय मार्गदर्शन (Vocational Guidance) आणि मानसशास्त्रीय समुपदेशन (Psychological Guidance) विभाग स्थापन करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-४२१७/(९३/२०१७)/प्रशिक्षण**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २५ ऑक्टोबर, २०१७

__वाचा:-__ १) शासन निर्णय, क्रमांक :-डायट-४५१६/(प्र.क्र.४०/२०१६)/प्रशिक्षण,दिनांक- १७ ऑक्टोबर, २०१६.
२) शासन निर्णय, क्रमांक :-डायट-४५१७/(प्र.क्र.८४/२०१७)/प्रशिक्षण,दिनांक- २४ ऑगस्ट, २०१७.

__प्रस्तावना :-__

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी या हेतूने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा कार्यक्रम राज्यात सुरु करण्यात आला. शैक्षणिक गुणवत्तेचे उद्दिष्ट समोर ठेवून दिनांक १७ ऑक्टोबर ,२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विद्या प्राधिकरणाची पुनर्रचना करण्यात आली. त्यानुसार विद्या प्राधिकरणांतर्गत राज्याच्या अन्य राज्यस्तरीय संस्थांचे विलीनीकरण करून राज्य स्तरावर राज्य विद्या प्राधिकरण आणि प्रादेशिक स्तरावर प्रादेशिक विद्या प्राधिकरण स्थापित करण्यात आले. नाशिक आणि अमरावती येथील DIET जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था याचे उच्चीकरण करून प्रादेशिक विद्या प्राधिकरण स्थापण्यात आले आहे. तसेच नागपूर येथील राज्य विज्ञान संस्थेस प्रादेशिक विद्या प्राधिकरण, नागपूर (गणित व विज्ञान तज्ञत्व) तसेच औरंगाबाद येथील राज्य आंग्लभाषा संस्थेस प्रादेशिक विद्या प्राधिकरण, औरंगाबाद (इंग्रजी तज्ञत्व) व मुंबई येथील व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्थेचे (IVGS) प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई (IVGS तज्ञत्व) असे विलीनीकरण करण्यात आले आहे.

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना सध्याच्या स्पर्धात्मक युगात आवश्यक आव्हाने पेलण्याकरिता मुलांना मानसिकदृष्टया सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. याकरिता प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई (IVGS तज्ञत्व) या संस्थेस महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे येथे पुनर्स्थापित करुन व्यवसाय मार्गदर्शन (Vocational Guidance) आणि मानसशास्त्रीय समुपदेशन (Psychological Guidance) हा एक विभाग विद्याप्राधिकरणांतर्गत स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

__शासन निर्णय :-__

उपरोक्त बाबी विचारात घेता सद्य परिस्थितीत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. मुंबई येथील पूर्वीचे व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्थेचे (IVGS) दि. १७ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विभागीय विद्या प्राधिकरण, मुंबई (IVGS तज्ञत्व) असे नामकरण करण्यात आले आहे. या शासन निर्णयानुसार मुंबई प्रादेशिक विद्याप्राधिकरण यापुढे IVGS तज्ञत्व शिवाय राहील आणि महाराष्ट्र विद्या प्राधिकरण पुणे येथे व्यवसाय मार्गदर्शन (VG) आणि मानसशास्त्रीय समुपदेशन (PG) असे नव्याने विभाग सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. मुंबई येथील सद्यस्थितीतील कार्यरत व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्थेमधील (IVGS) कर्मचाऱ्यांच्या सोयी लक्षात घेऊन नवीन पदस्थापना महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांनी कराव्यात.

३. तसेच, प्रादेशिक विभागांमध्ये असलेल्या प्रादेशिक व्यवसाय मार्गदर्शन निवड संस्थांमधील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सोयी लक्षात घेवून नवीन पदस्थापना विभागीय विद्याप्राधिकरण, DIECPD येथे करण्यात याव्यात.

४. IVGS मुंबई तसेच प्रादेशिक IVGS मधील कार्यरत कर्मचाऱी हे यापुढे संबंधित विभागीय विद्याप्राधिकरण / DIECPD चे कर्मचारी म्हणून समजण्यात येतील.

५. राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन प्राप्त होईल. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातील नवीन आव्हाने पेलण्यास विद्यार्थी मानसिकदृष्ट्या सक्षम होतील या हेतूने विद्या प्राधिकरणांतर्गत या विभागाने कामाचे नियोजन करावे. याकरिता राज्यातील शिक्षकांपैकी उत्कृष्ट ६६ शिक्षकांची निवड प्रक्रियेतून DIECPD स्तरावर प्रत्येकी २ अशी निवड करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१७१०२५१७३३५४१२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Nand Kumar

Digitally signed by Nand Kumar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, serialNumber=dcd3577ebf0e05e2a8b57095c152dc6cfb37c2bb83da197788645dd8a362ebc5, cn=Nand Kumar
Date: 2017.10.25 17:22:56 +05'30'

**(नंदकुमार)**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
२. मा.प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक
३. आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
५. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
७. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर), जिल्हा परिषद
८. सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (DIECPD)
९. सर्व उपप्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (DIECPD)
१०.शिक्षण निरिक्षक (पश्चिम/दक्षिण/उत्तर), बृहन्मुंबई.
१२ निवडनस्ती (प्रशिक्षण)